अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि.१४.०९.२०२३ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वाद सुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, श्री. ढवळे बप्पासाहेब विनायक उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशिल |
|---|---|---|
| १२ | ०३.०५.२०२३ | मुद्दा क्र.१ मा. श्री. ए.व्ही. शिरपूरकर शाखा अभियंता यांनी विविध योजनातून इ.स.२०२२-२३ मध्ये केलेल्या अंदाजपत्रक व मोजमाप पुस्तीकेच्या छायांकित प्रत मिळने व दैनंदिन दौरे केलेली पुस्तीकाचे छायांकित प्रत मिळणे. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने अपिलार्थीस माहिती दिलेली आहे अपिलार्थी यांनी दि.१४.०६.२०२३ रोजी माहिती स्वीकारुन

माहिती मिळाल्याची पोहच दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिलेली आहे. अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत नाही. अपिलार्थीस माहिती मिळाली असल्यामुळे अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.व्दि.अ.५९६७/२०२३/एस/ 19035 दिनांक: 18/10/2024

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ७०५०/२०२३ व ३७५१/२०२३**
**बोर्ड अ.क्र.१३ व १५**

श्री. राजाराम दामु काळेबाग,
मु. पो. अचकदाणी, ता. सांगोला, जि. सोलापूर ... अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
वरिष्ठ सहाय्यक,
जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग, धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
उप अभियंता,
जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग, धाराशिव

**(सुनावणी दिनांक २५.०९.२०२४)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि.३०.१०.२०२३ व दि.१३.०६.२०२३ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वाद सुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, श्री. नागनाथ गंगाधरराव उलिगडे व प्रथम अपिलीय अधिकारी, श्री. नागनाथ भागवतराव काळे उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी त्यांच्या दोन माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशिल |
|---|---|---|
| १३ | १०.०८.२०२३ | दि.०१ जानेवारी २०२२ ते आजतागायत जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, धाराशिव या कार्यालयातील झालेल्या सुविधा कामाची गावनिहाय यादी अंदाजपत्रक, खर्ची रक्कम कामाजा दर्जा, वरिष्ठाने दिलेले कामाचे अभिप्राय याची माहिती साक्षांकित प्रतीसह मिळावी. |
| १५ | १५.१२.२०२३ | दि.०१ जानेवारी २०२० ते आजतागायत जि.ब. बांधकाम उपविभाग, धाराशिव या कार्यालयाची ए.पी.ओ (A.P.O.)ची माहिती साक्षांकित प्रतिसह मिळावी. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती गट विकास अधिकारी, पंचायत समिती, धाराशिव या कार्यालयाशी संबंधीत आहे. तसे दि.०४.०९.२०२३ रोजीच्या पत्रान्वये वर्ग करुन त्याची प्रत अपिलार्थीस पाठविलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, आदेश दिला नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२८.०६.२०२४ रोजी सुनावणी घेऊन, मागणी केलेली माहिती ही पंचायत समिती, धाराशिव यांचेशी संबंधीत असल्याने सदर माहितीची आवश्यकता असल्यास संबंधीत अपिलार्थी यांनी माहिती मिळणेबाबतचा स्वतंत्र अर्ज पंचायत समिती, धाराशिव या कार्यालयास करुन माहिती हस्तगत करुन घ्यावी असा निर्णय पारित केल्याचे दिसून येत आहे.

प्रस्तुत प्रकरणात, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी घेतलेला निर्णय कायम करण्यात करण्यात येत आहे. अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

दोन व्दितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.व्दि.अ७०५०व ३७५१/२०२३/एसएस/ 19036 दिनांक: 18/10/2024

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ७०६७/२०२३
बोर्ड अ.क्र.१४

श्री. राजाराम दामू काळेबाग, — अपिलार्थी
रा. अचकदाणी, ता. सांगोला, जि. सोलापूर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
सहजिल्हा निबंधक वर्ग-२,
जिल्हा निबंधक कार्यालय, धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
सहजिल्हा निबंधक वर्ग-१,
जिल्हा निबंधक कार्यालय, धाराशिव

(सुनावणी दिनांक २५.०९.२०२४)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि.३०.१०.२०२३ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वाद सुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांच्या वतीने प्रतिनिधी श्री. शिवशंकर राजाभाऊ पवार व प्रथम अपिलीय अधिकारी, श्री. रामहरी गिरीराव जानकर उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशिल |
|---|---|---|
| १४ | १०.०८.२०२३ | सन ०१ जानेवारी २०१७ ते आजतागायत, आपलया अधिनस्त असलेल्या सर्व दुय्यम निबंधक कार्यालयानी व आपण माहिती अधिकारी २००५ कलम २५ नुसार केलेले अहवालाची माहिती मिळणेबबत माहिती RTI लोगोसह मिळावी. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले

की, अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने अपिलार्थीस माहिती दिलेली आहे. अपिलार्थी यांनी दि.२५.११.२०२३ रोजी माहिती स्वीकारुन माहिती मिळाल्याची पोहच दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, आदेश मिळाला नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिलेली आहे. अपिलार्थी यांनी माहिती स्वीकारुन माझी काहीही तक्रार नाही, सदरचा अर्ज निकाली काढावा ही विनंती, केल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत नाही. अपिलार्थीस माहिती मिळाली असल्यामुळे अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.व्दि.अ.७०६७/२०२३/एस/ 19037 दिनांक: 18/10/2024

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २७३९/२०२३**
**बोर्ड अ.क्र.१६**

श्री. अंगद नरहरीराव भोसले, अपिलार्थी
रा. सर्व्हे नं.५३/५८, साईनाथनगर, वडगांव शेरी, पुणे-१४

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा उत्तरवादी क्र.१
अधिक्षक वर्ग-२, शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद, धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा उत्तरवादी क्र.२
उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, धाराशिव

**(सुनावणी दिनांक २५.०९.२०२४)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि.२१.०४.२०२३ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वाद सुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, श्री. सांगळे उध्दव आबा उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशिल |
|---|---|---|
| १६ | १०.१०.२०२२ | तीन अपल्य प्रकरणी बडतर्फ केलेल्या शिक्षकांची संचिका मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने अपिलार्थीस दि.०९.११.२०२२ रोजीच्या पत्रान्वये, सदरची संचिका ही मोठया प्रमाणात आहे. त्यामुळे आपण दि.२१.११.२०२२ रोजी या कार्यालयात उपस्थित राहून संचिकेची पाहणी करावी, आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल, असे कळविलेले होते. तथापि अपिलार्थी यांनी कोणताही प्रतिसाद दिलेला नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अवलोकनाची संधी दिल्याचे दिसून येत आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी दि.०९.११.२०२२ रोजीच्या पत्रात नमूद केले आहे की, उक्त दिनांकास उपस्थित न राहील्यास आपणास ही माहिती उपलब्ध करुन घेण्यामध्ये इच्छुक नाही असे समजून आपला अर्ज नस्ती बंद करण्यात येईल, असे स्पस्टपणे कळविलेले आहे. त्याप्रमाणे अपिलार्थी माहिती उपलब्ध करुन घेण्यासाठी कार्यालयात उपस्थित राहिले नाहीत. अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन घेण्यास स्वारस्य दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद योग्य दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.व्दि.अ.२७३९/२०२३/एस/- 13038 दिनांक:- 18/10/2024

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ३०८६,३०९१,३१०६,३९१६ ते ३९१९,६८८३ व ६१३९/२०२३ एकूण ०९ नस्ती**

**बोर्ड क्र.१७ ते २५**

श्री. सुनिल दत्तात्र्य गायकवाड,
रा. तोरणा कामधेनु सोसायटी,
फ्लॅट नंबर डी-२, पुणे सोलापूर रोड,
हडपसर, पुणे-४११०२८ — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
अधिक्षक वर्ग-२,
शिक्षण विभाग (प्राथमिक),
जिल्हा परिषद, धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, धाराशिव — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २५.०९.२०२४)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि.१०.०५.२०२३ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये नऊ द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वाद सुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, श्री. सांगळे उध्दव आबा, उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. तथापि अपिलार्थी यांनी आज रोजी सुनावणीच्या अनुषंगाने दि.२५.०९.२०२४ रोजी लेखी निवेदन आयोगाच्या पटलावर सादर केलेले आहे. त्यात त्यांनी असे नमूद केले आहे की, (LLB-II वर्षाची लेखी परिक्षा असल्यामुळे उपस्थित राहू शकत नाही. सदर गैरहजेरी क्षमापित करावी किंवा पुढील तारीख देण्यात यावी असे नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी त्यांच्या नऊ माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड अ.क्र. | द्वितीय अपील क्रमांक | माहिती अर्जाचा दिनांक | माहितीचा तपशिल/ विषय |
|---|---|---|---|
| १७ | ३०८६/२०२३ | १५.०२.२०२३ | सन २०२२-२०२३ या कालावधीतील इनकम टॅक्सबाबत १६ A प्रपत्र मिळणेबाबत. |
| १८ | ३०९१/२०२३ | १५.०२.२०२३ | सन ऑक्टोबर २०२० ते नोव्हेंबर २०२१ या कालावधीतील शोलेय पोषण आहार अधिकक्ष वर्ग-२, पदाचे अतिरिक्त मानधन मिळणेबाबत. |
| १९ | ३१०६/२०२३ | १५.०२.२०२३ | २०१९-२०२० या कालावधीची अतिरिक्त कार्यभार धारण केल्याबाबत विशेष वेतन मंजूरीबाबत. |
| २० | ३९१६/२०२३ | २०.०३.२०२३ | माहे ऑक्टोबर २०२० त ऑगस्ट २०२२ या कालावधीतील प्रवास व दैनिक भत्ता (दौरा कार्यालयीन काम). |
| २१ | ३९१७/२०२३ | २०.०३.२०२३ | सन २०२२ मं २०२३ या कालावधीतील भविष्य निर्वाह निधी अंतिम देयकाची रक्कम मिळणेबाबत. |
| २२ | ३९१८/२०२३ | २०.०३.२०२३ | सन २०२२ मं २०२३ या कालावधीतील रजा रोखीकरण, गटविमा योजना, पेन्शन विक्री रक्कम तात्काळ मिळणेबाबत. |

| | | | |
|---|---|---|---|
| २३ | ३९१९/२०२३ | २०.०३.२०२३ | सन२०२२ ते २०२३ या कालावधीतील सेवा निवृत्ती नंरचे प्रवास देयक व माहे सप्टेंबर ते नोव्हेबर २०२२ चे प्रवास व दैनिक भत्ता देयके मिळणेबाबत. |
| २४ | ६८८३/२०२३ | ०३.०७.२०२३ | दि.१७.०४.२०२३ पासून ते माहिती मिळेपर्यंत, रजा रोखीकरण, गटविमा, प्रवास व दैनिक भत्ते सेवानिवृत्ती नंतरचे प्रवास देयक प्रलंबित करण्याबाबत. |
| २५ | ६१३९/२०२३ | ०३.०७.२०२३ | माहे मे २०२३ पासून ते माहिती मिळेपर्यंत या कालावधीतील अतिरिक्त कार्यभार सांभाळल्याबद्दल विशेष वेतन मंजूर करणेबाबत. |

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती विस्तृत व व्यापक स्वरुपाची असल्यामुळे देता आलेली नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही व सुनावणी घेतली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

उपलब्ध कागदत्रे व युक्तिवादावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना दिली असल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येत नाही. अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक वर्ग-२ शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद, धाराशिव यांनी अपिलार्थी यांच्या (नऊ) जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
२. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, धाराशिव यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.
३. उपरोक्त निर्देशासह नऊ द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.व्दि.अ. ३०८६,३०९१,३१०६,३९१६ ते ३९१९,६८८३ व ६१३९/२०२३ /एसएस/19026 दिनांक : 18/10/2024

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४४३५/२०२३ व ४४३६/२०२३**
**बोर्ड क्र.२६ व २७**

श्री. नागसन हणमंतराव बनसोडे, — अपिलार्थी
रा. मुरूम, ता. उमरगा, जि. धाराशिव-४१३ ६०५.

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
अधिक्षक वर्ग-२,
शिक्षण विभाग (प्राथमिक),
जिल्हा परिषद, धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, धाराशिव

(सुनावणी दिनांक २५.०९.२०२४)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि.०५.०७.२०२३ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वाद सुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी, श्री. सांगळे उध्दव आबा उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड अ.क्र. | द्वितीय अपील क्रमांक | माहिती अर्जाचा दिनांक | माहितीचा तपशिल/ विषय |
|---|---|---|---|
| २५ | ४४३५/२०२३ | २७.०२.२०२३ | २०१९ ते २०२३ या कालावधीतील सुलभ संदर्भासाठी मा.चौकशी अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी पं.स. तुळजापूर यांच्या जा.क्र.गशिका/पुसतु/कावि/१६६१/२०१९ दि.१६.११.२०१९ रोजीच्या चौकशी अहवालावर पुढील कार्यवाकरिता मा. विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर कार्यालयाकडे दाखल केलेले प्रकरण कृपया पहावे व इतर ..३ |
| २६ | ४४३६/२०२३ | २७.०२.२०२३ | सन २०१८ ते २०२३ पर्यंत शैक्षणिक वर्षे २०१८ ते २०२२ यावर्षात जिल्ह्यातील अनुदानित, अंशत: अनुदानित खाजगी शिक्षण संस्थेने नियुक्त केलेल्या शिक्षण सेवक कायम सहशिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची माहिती इतर ..५ |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, मला कोणतीच माहिती मिळाली नाही, ती उपलब्ध करुन देण्यात यावी.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती विस्तृत व व्यापक स्वरुपाची असल्यामुळे देता आलेली नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, विहित वेळेत

माहिती देण्यास नकार, असे कारण नमूद केलेले आहे.

उपलब्ध कागदपत्रे व युक्तिवादावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना दिली असल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येत नाही. अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक वर्ग-२,शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद, धाराशिव यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र (दोन) अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, धाराशिव यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह दोन द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.द्वि.अ. ३०८६,३०९१,३१०६,३११६ ते ३११९,६८८३ व ६१३९/२०२३ /एसएस/ 19039 दिनांक : 18/10/2024

सत्यमेव जयते

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १६७९/२०२३ व ४७४०F/२०२३**
**बोर्ड क्र.२८ व ३०**

श्री. प्रविण विश्वनाथ गायकवाड, — अपिलार्थी
मु. पो. नांदूर (घाट), ता. केज, जि. बीड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
शिक्षण विभाग (माध्यमिक),
जिल्हा परिषद, धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, धाराशिव

(सुनावणी दिनांक २५.०९.२०२४)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि.०६.०३.२०२३ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वाद सुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी श्री. सोनटक्के आर.बी. उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी त्यांच्या दोन माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड अ.क्र. | द्वितीय अपील क्रमांक | माहिती अर्जाचा दिनांक | माहितीचा तपशिल/ विषय |
|---|---|---|---|
| २८ | १६७९/२०२३ | १४.१२.२०२२ | आपले सरकार पोर्टल टोकन आयडी अर्ज Dist/Zpost/२०२२/२०७२ दि.२६.०९.२०२२ नुसार लेखी माहिती मिळणेबाबत. |
| ३० | ४७४०F/२०२३ | १२.०५.२०२३ | आपल्या कार्यालयांत दिलेला ऑनलाईन RTI अर्ज दि.०७.११.२०२२ व ऑनलाईन प्रथम अपील दि.०८.१२.२०२२ नुसार लेखी माहिती मिळावी व प्रकरण निकाली काढावे. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, मला चुकीची माहिती मिळालेली आहे, मला ती परिपुर्ण माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशीत करावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, विहित वेळेत माहिती देण्यास नकार, असे कारण नमूद केलेले आहे.

उपलब्ध कागदपत्रे व युक्तिवादावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाद्वारे मागणी

केलेली माहिती त्यांना दिली असल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येत आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपील अर्जावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२१.०६.२०२३ रोजी सुनावणी घेऊन पारित केलेल्या आदेशामध्ये अपिलार्थी यांनी ज्या मुद्याबाबत माहिती मागितली होती त्या संबंधीत माहिती त्यांना समक्ष निदर्शनास आणून दिल्याचे नमूद केलेले आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिल सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांच्या निदर्शनास आणून दिलेली आहे. अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत नाही, या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थीचे द्वितीय अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

दोन्ही द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.द्वि.अ. १६७९/२०२३ व ४७४०F/२०२३/एसएस/ 19040 दिनांक : 18/10/2024

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २२४४/२०२३ ते २२५१/२०२३-०८**
**बोर्ड क्र.३१ ते ३८**

श्री. बाळासाहेब माणिकराव पाटील, — अपिलार्थी
मु. पो. देवळाली, ता. कळंब, जि. धाराशिव

विरुध्द

१ मुख्याध्यापक, — : उत्तरवादी क्र.१
जागृती विद्या मंदिर देवळालली, ता. कळंब, जि. धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, धाराशिव

**(सुनावणी दिनांक २५.०९.२०२४)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये आठ द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलांची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. (तथापि प्रथम अपिलीय अधिकारी यांनी स्वाक्षरी केलेला राजनामा सादर केलेला नाही.)

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी आठ माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड अ.क्र. | द्वितीय अपील क्रमांक | माहितीचा अर्जाचा दिनांक | माहितीचा तपशिल/ विषय |
|---|---|---|---|
| ३१ | २२४४/२०२३ | २६.१२.२०२२ | सन २००६ ते आजतागायतचे माध्यमिक शाला परिक्षा शुल्क माफीच्या वाटप पावत्या व लाभार्थी सालनिहाय |
| ३२ | २२४५/२०२३ | २६.१२.२०२२ | सन २००९ च्या नंतर या कालावधीतील बी.बी. नागरगोजे व बोंदर डी.एस. यांचे वैयक्तिक मान्यता प्रस्ताव |
| ३३ | २२४६/२०२३ | २६.१२.२०२२ | सन २००८ ते आजतागायत या कालावधीतील भांडारगृह व्यायाम शाळा व क्रिडासाहित्य |
| ३४ | २२४७/२०२३ | २६.१२.२०२२ | सन २०१६ ते आजतागायत या कालावधीतील कर्मचारी वेतन वाटप व सेवापुस्तके |
| ३५ | २२४८/२०२३ | २६.१२.२०२२ | शैक्षणिक वर्ष २००३-०४ ते आजतागायत या कालावधीतील सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती वाटप पावत्या |
| ३६ | २२४९/२०२३ | २६.१२.२०२२ | २००३-०४ ते आजतपागायत या कालावधीतील शिष्यवृत्ती (S.C., S.T., O.B.C.) लाभार्थ्यांची यादी व वाटप पावत्याच्या सत्यप्रती द्याव्यात. |
| ३७ | २२५०/२०२३ | २६.१२.२०२२ | सन २०१० ते आजतागायत या कालावधीतील १०० बिंदू नामावली रजिस्टरची सत्यप्रत द्यावी. |
| ३८ | २२५१/२०२३ | २६.१२.२०२२ | सन २००९ ते आजतागायत या कालावधीतील निलंबीत मु.अ.सौ. मिरा जाधवर यांच्या शाळेतील दैनंदिन उपस्थिती व कर्तव्याबाबत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी मला कोणतीच माहिती दिलेली नाही. ती उपलब्ध करुन देण्याचे आदेशीत करावे अशी विनंती केलेली आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, शाळेला शासनाचे कोणतेही अनुदान नाही. त्यामुळे अपिलार्थीस माहिती.दिलेली नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध कागदपत्रे व युक्तिवादावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती विस्तृत व्यापक स्वरुपाची आहे. ती माहिती उघड केल्याने कोणते जनहित साध्य होणार आहे हे अपिलार्थी यांनी सांगू शकले नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान सांगितले की, सदर शाळा ही विनाअनुदानीत असून माहिती अधिकार अधिनियम २००५ कायदा शाळेला लागू होत नाही.

प्रस्तुत प्रकरणातील संस्था ही सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याख्येत बसत नाही. या संस्थेस शासनाचे कोणतेही भरीव अनुदान नाही. म्हणून ही संस्था अधिनियमातील कलम २(h) मध्ये नमूद केलेल्या सार्वजनिक प्राधिकरण या व्याख्येत येत नाही. संस्थेस माहिती अधिकार अधिनियम २००५ हा कायदा लागू होत नाही. त्यामुळे अपिलार्थीस माहिती देय होणार नाही. या निष्कर्षाप्रत येऊन, अपिलार्थीचे आठ द्वितीय अपील फेटाळण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

आदेश

आठ द्वितीय अपिले फेटाळण्यात येत आहे.

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.वि.अ २२४४/२०२३ ते २२५१/२०२३-०८ /एस.एस/- 19041 दिनांक:- 18/10/2024

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ७०७०/२०२३ ते ७०७८/२०२३-०९**
**बोर्ड क्र.३९ ते ४७**

१. श्री. शरद साहेबराव गालट, — अपिलार्थी
२. श्री. संदीप प्रकाश लोमटे,
३. श्री. सचिन मनोहर माने,
४. श्री. महादेव भिमराव लोमटे,
५. श्री. महादेव भिमराव लोमटे,
६. श्री. भास्कर मारुती कराड,
७. श्री. भास्कर मारुती कराड,
८. श्री. वैभव दत्तु वाघमारे,
९. श्री. वैभव दत्तु वाघमारे
हे सर्व मु.पो. माळकरंजा, ता.कळंब, जि. धाराशिव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
मुख्याध्यापक,
शिव छत्रपती विद्यालय माळकरंजा, ता. कळंब, जि. धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, धाराशिव

(सुनावणी दिनांक २५.०९.२०२४)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये नऊ द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत, सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी सर्व सर्व अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, श्री. गाढवे व प्रथम अपिलीय अधिकारी याचे प्रतिनिधी श्री. सोनटक्के आर.बी. उपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड अ.क्र. | द्वितीय अपील क्रमांक | माहितीचा अर्जाचा दिनांक | माहितीचा तपशिल/ विषय |
|---|---|---|---|
| ३९ | ७०७०/२०२३ | १८.०७.२०२३ | सन १९९२-९३ ते आजतागायत, सदर प्राथमिक व माध्यमिक शाळा शासकीय अनुदानास पात्र करण्यासाठी मा. शिक्षणाधिकारी धाराशिव यांच्याकडे दाखल केलेल्या सर्व टप्पा निहाय प्रस्तावाच्या सत्यप्रती दयाव्यात. |
| ४० | ७०७१/२०२३ | १७.०८.२०२३ | सन १९९२-९३ ते आजतागायत, आपल्या शाळेत संस्थेत स्वमालकिची जागा आहे का असल्यास त्याचा पुरावा दयावा नसल्यास भाडे कराराची सत्यप्रत दयावी. |
| ४१ | ७०७२/२०२३ | १८.०७.२०२३ | सन १९९२-९३ ते आजतागायत, १. आपल्या शाळेत माध्यमिक शासनाने ठरवून दिलेल्या कोणकोणत्या भौतीक व मुलभूत सुविधा उपलब्ध आहेत त्याची माहिती दयावी .२. आपल्या प्राथमिक शाळेत शासनाने ठरवून दिलेल्या कोणकोणत्या भौतिक व मुलभूत सुविधा |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | उपलब्ध आहेत याची माहिती दयावी. |
| ४२ | ७०७३/२०२३ | १८.०७.२०२३ | सन १९९२-९३ ते आजतागायत आपल्या शाळेत विज्ञान प्रयोग शाळा आहे कि कशी असल्यास विज्ञान साहित्याची सूची दयावी. |
| ४३ | ७०७४/२०२३ | १८.०७.२०२३ | सन १९९२-९३ ते आजतागायत आपल्या प्राथमिक व माध्यमिक शाळा संस्थेच्या सन १९९२-९३ ते आजतागायत झालेल्या लेखा परिक्षणाच्या (ऑडिट) सत्यप्रती दयाव्यात. |
| ४४ | ७०७५/२०२३ | १८.०७.२०२३ | सन १९९२-९३ ते आजतागायत आपल्या शाळा/ संस्थेने जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालय यांच्या कडून आजतागायत कोणते अनुदान घेतले आहे का असल्यास त्याचा तपशिल व प्रस्तावाच्या सत्यप्रती दयाव्यात. |
| ४५ | ७०७६/२०२३ | १८.०७.२०२३ | सन १९९२-९३ ते आजतागायत कर्मचारी वेतन वाटपाच्या पावत्या व सर्व कर्मचाऱ्याच्या अद्यावत सेवापुस्तीकेच्या सत्यप्रत देण्यात याव्यात. |
| ४६ | ७०७७/२०२३ | १८.०७.२०२३ | सन १९९२-९३ ते आजतागायत शैक्षणिक वर्षात सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती (SC, ST,OBC) लाभार्थ्यांची यादी तसेच मंजूर रक्कमेचे वाटप रजिस्टर / पावत्या यांच्या सत्यप्रती दयाव्या. |
| ४७ | ७०७८/२०२३ | १८.०७.२०२३ | सन १९९२-९३ ते आजतागायतच्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र शुल्कमाफी लाभार्थ्यांची साल निहाय यादी व मंजूर रक्कमेच्या वाटप पावत्याच्या सत्यप्रती तसेच सन २००१-०२ ते आजतागायतच्या प्राथमिक शालांत प्रमाणपत्र शुल्कमाफी लाभार्थ्यांची सालनिहाय यादी व मंजूर रक्कमेच्या वाटप पावत्याच्या सत्यप्रती. |

आज रोजी सुनावणीदरम्यान सर्व अपिलार्थी यांनी अवगत केले की, आम्हाला माहिती मिळाली नाही व सुनावणी घेतली नाही.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीच्या अनुषंगाने अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती तयार करुन दि.१८.०८.२०२३ रोजी देण्यास गेले असता, संबंधीतानी माहिती घेण्यास नकार दिल्यानंतर आम्ही ती माहिती पोस्टाने पाठवली व काही माहिती मा. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, यांच्याकडे जमा केलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, व आदेश दिला नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध कागदपत्रे व युक्तिवादावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती विस्तृत व्यापक स्वरुपाची आहे. तथापि जन माहिती अधिकारी माहिती देण्याचा प्रयत्न केलेला आहे. शाळेच्या मुख्याध्यापकाला वेठीला धरुन त्रास देण्याच्या हेतूने सदरचा अर्ज केल्याचे दिसून येत आहे. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थीचे नऊ द्वितीय अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

**आदेश**

नऊ द्वितीय अपिले निकाली येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.वि.अ ७०७०/२०२३ ते ७०७८/२०२३-०९ /एस एस/ 19042 दिनांक : 18/10/2024

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ७०७९/२०२३ ते ७०८७/२०२३-०९
बोर्ड क्र.४८ ते ५६

१. श्री. जरिचंद शिवाजी लोमटे, — अपिलार्थी
२. श्री. नाना गिणा वटाणे,
३. श्री. नाना गिणा वटाणे,
४. श्री. सर्जेराव आत्माराम लोमटे,
५. श्री. सर्जेराव आत्माराम लोमटे,
६. श्री. विजय व्यंकट शिंदे,
७. श्री. विजय व्यंकट शिंदे,
८. श्री. विलास महादेव मोहिते,
९. श्री. विलास महादेव मोहिते,
हे सर्व मु.पो. माळकरंजा, ता.कळंब, जि. धाराशिव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
मुख्याध्यापक,
शिव छत्रपती विद्यालय माळकरंजा, ता. कळंब, जि. धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, धाराशिव

(सुनावणी दिनांक २५.०९.२०२४)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये नऊ द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल, अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी सर्व अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, श्री. गाढवे व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. सोनटक्के आर.बी. उपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड अ.क्र. | द्वितीय अपील क्रमांक | माहितीचा अर्जाचा दिनांक | माहितीचा तपशिल/ विषय |
|---|---|---|---|
| ४८ | ७०७९/२०२३ | १७.०७.२०२३ | सन १९९२-९३ ते आजतागायत, आपल्या शाळेचे लिपीक, श्री. लोमटे एम.आर. यांचे पर्यवेक्षाधीन सेवासातत्य मान्यता प्रस्तावाच्या सत्यप्रती दयाव्यात. |
| ४९ | ७०८०/२०२३ | १७.०८.२०२३ | सन २००१-०२ ते आजतागायत सदर शाळेतील सहशिक्षक १. मैदांडे व्ही.जि. २. शितोळे एस.यू. ३. खुडे के.जि. ४. गोरे आर. व्ही. यांच्या पर्यवेक्षाधिन सेवा सातत्य मान्यता प्रस्तावाच्या सत्यप्रती देण्यात याव्या. |
| ५० | ७०८१/२०२३ | १७.०७.२०२३ | सन १९९२-९३ ते आजतागायत, सदर शाळेतील सहशिक्षक १ श्री गाढवे व्ही के, मुख्याध्यापक, २ वांगजे एस पी ३. शिंदे पी यू ४ भाटे एस के ५. तांबे व्ही बी ६ क्लार्क लोमटे एम आर सेवक १ जाधवर एस एम २. बऱ्हाळे एस वाय ३. ढोकळे आर टी ४. रसाळ एम एफ यांच्या पर्यवेक्षाधिन सेवासातत्य मान्यता प्रस्तावाच्या सत्यप्रती देण्यात याव्यात. |

| | | | |
|---|---|---|---|
| ५१ | ७०८२/२०२३ | १७.०७.२०२३ | सन २००१-०२ ते आजतागायत मा आयुक्त मा व उ औरंगाबाद यांनी प्रमाणित केलेल्या बिंदूनामावली रजिष्टरची सत्यप्रत दयावी. |
| ५२ | ७०८३/२०२३ | १७.०७.२०२३ | सन १९९२-९३ ते आजतागायत मा आयुक्त मा व उ औरंगाबाद यांनी प्रमाणित केलेल्या बिंदूनामावली रजिष्टरची सत्यप्रत दयावी. |
| ५३ | ७०८४/२०२३ | १७.०७.२०२३ | सन २००१-०२ ते आजतागायत सदर शाळेची अद्ययावत बिंधूनामावली संस्थेची सेवा जेष्ठता यादी भौतीक सुविधेची संच मान्यता R.T.E. मान्यता या सर्वाच्या सत्यप्रती. |
| ५४ | ७०८५/२०२३ | १७.०७.२०२३ | सन १९९२-९३ ते आजतागायत सदर शाळेची अद्ययावत बिंधूनामावली संस्थेची सेवा जेष्ठता यादी भौतीक सुविधेची संच मान्यता R.T.E. मान्यता या सर्वाच्या सत्यप्रती. |
| ५५ | ७०८६/२०२३ | १७.०७.२०२३ | सन २००१-०२ ते आजतागायत सदर शाळा/ संस्थेत आरक्षण धोरणाचे पालन झाले आहे की कसे तसेच शाळा अनुदानास पात्र करताना केलेल्या निकष पुर्ततेची टप्पा निहाय माहिती व त्यासाठी शाळा संस्थेने दाखल केलेल्या संपूर्ण प्रस्तावाच्या सत्यप्रती. |
| ५६ | ७०८७/२०२३ | १७.०७.२०२३ | सन १९९२-९३ ते आजतागायत सदर शाळा/ संस्थेत आरक्षण धोरणाचे पालन झाले आहे की कसे तसेच शाळा अनुदानास पात्र करताना केलेल्या निकष पुर्ततेची टप्पा निहाय माहिती व त्यासाठी शाळा संस्थेने दाखल केलेल्या संपूर्ण प्रस्तावाच्या सत्यप्रती. |

आज रोजी सुनावणीदरम्यान सर्व अपिलार्थी यांनी अवगत केले की, आम्हाला माहिती मिळाली नाही व सुनावणी घेतली नाही.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीचे प्रत्येक शाळेचे मुख्याध्यापक हे जन माहिती अधिकारी असल्यामुळे शाळेला वर्ग केलेले आहेत. मुख्याध्यापक यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती तयार करुन वेळोवेळी देण्यास गेले असता, संबंधीतानी माहिती घेण्यास नकार दिल्यानंतर आम्ही ती माहिती पोस्टाने पाठवली व काही माहिती मा. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, यांच्याकडे जमा केलेली आहे. तसेच सदरची माहिती सोबत आणलेली आहे. आयोगाच्या आदेशाप्रमाणे ती अपिलार्थीस देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, कोणतीही माहिती अथवा आदेश दिला नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध कागदपत्रे व युक्तिवादावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती विस्तृत व्यापक स्वरुपाची आहे. तथापि जन माहिती अधिकारी माहिती देण्याचा प्रयत्न केलेला आहे. शाळेच्या मुख्याध्यापकाला वेठीला धरुन त्रास देण्याच्या हेतूने सदरचा अर्ज केल्याचे दिसून येत आहे. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थीचे नऊ द्वितीय अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

<u>आदेश</u>

नऊ द्वितीय अपिले निकाली येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.द्वि.अ ७०७९/२०२३ ते ७०८७/२०२३-०९ /एस एस/ 19043 दिनांक : 18/10/2024

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २२२५/२०२३**
**बोर्ड अ.क्र.५७**

श्री. राजाराम दामु काळेबाग, — अपिलार्थी
रा. अचकदानी, ता. सांगोला, जि. सोलापूर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — उत्तरवादी क्र.१
वरिष्ठ सहायक,
ग्रामीण पाणी पुरवठा, जिल्हा परिषद, उपविभाग, तुळजापूर,
जि. धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उप अभियंता,
ग्रामीण पाणी पुरवठा, जिल्हा परिषद, उपविभाग, तुळजापूर,
जि. धाराशिव

**(सुनावणी दिनांक २५.०९.२०२४)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि.०३.०४.२०२३ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वाद सुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, श्री. सुधाकर रावसाहेब पवार व प्रथम अपिलीय अधिकारी, श्री. नरेंद्र अंबरीश भुसारे उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशिल |
|---|---|---|
| ५७ | २४.१२.२०२२ | दि.०१.०१.२००७ ते आपण माहिती देईपर्यंत या कालावधीतील आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व कार्यालयानी व आपण खुद नी माहिती अधिकार अधिनियम २००५ कलम २५ नुसार केलेले अहवालाची माहिती मिळणेबाबत माहिती RTI लोगोसह मिळावी. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांची बदली झालेली आहे. त्यांनी काहीही प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणीच्या वेळी अपिलार्थीस माहिती अवलोकनासाठी कार्यालयात उपलब्ध करुन ठेवली होते. तथापि अपिलार्थी यांनी अवलोकनासाठी नकार दिलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस अवलोकनाची संधी दिल्याचे दिसून येत आहे. तथापि अपिलार्थी यांनी अवलोकन करुन माहिती घेतलेली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी दि.२०.०२.२०२३ रोजी सुनावणी घेऊन, कार्यालयातील उपलब्ध अभिलेखे तपासणी केली असता यापूर्वी कलम-२५ बाबतचा अहवाल वेळोवेळी शासनास सादर केलेला नसल्याचे जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ सहाय्यक प्रस्तुत कार्यालय यांनी निदर्शनास आणून दिले आहे. त्यामुळे सदरची माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देता येत नाही, असा निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने वस्तुस्थिती अपिलार्थीस कळविलेले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी घेतलेली भूमिका आयोगास योग्य दिसून येत आहे, या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थीचे द्वितीय अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.व्दि.अ.२२२५/२०२३/एस/ 15044 दिनांक : 18/10/2024

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ६३२५/२०२३ व ३३२८/२०२३**
**बोर्ड क्र.६० व ६१**

श्री. रुपेश ज्ञानोबा कांबळे, — अपिलार्थी
मु. पो. बेलंबा, ता. उमरगा, जि. धाराशिव-

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय, बेळंबा, ता. उमरगा, जि. धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, उमरगा, जि. धाराशिव

(सुनावणी दिनांक २५.०९.२०२४)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि.२८.०९.२०२३ व १२.०५.२०२३ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वाद सुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, श्री. जाधव रामदास विष्णू व प्रथम अपिलीय अधिकारी, श्री. राऊत एस एस उपस्थित आहेत. (तथापि अपिलार्थी यांनी स्वाक्षरी केलेला रोजनामा सादर केलेला नाही.)

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी त्यांच्या दोन माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड अ.क्र. | द्वितीय अपील क्रमांक | माहिती अर्जाचा दिनांक | माहितीचा तपशिल/ विषय |
|---|---|---|---|
| ६० | ६३२५/२०२३ | ०३.१०.२०२२ | सन २०२०-२०२१ या कालावधीतील १. लोकवस्ती मध्ये स्मशानभुमी अनाधिकृत बांधकाम केले बाबत.२. लोकवस्ती बाहेरील स्मशानभूमी मंजूरी असून लोकवस्ती हद्दीत बांधले ३. एकाच ठिकाणी स्मशान भूमीचा लाभ न घेता तो दोन ठिकाणी घेण्यात आला ४. माझ्या घराच्या दवरवाज्या समोर स्मशानभूमीचे गेट घेण्यात आला आहे. |
| ६१ | ३३२८/२०२३ | ०९.११.२०२१ | मौजे बेळंब ता. उमरगा येथे मुस्लिम स्मशानभुमीस वॉल कंपाऊड बाधणे योजनेचे नाव जनसुविधा विशेष अनदु ान योजना सन २०२०-२१ अंदाजपत्रकीय रक्कम १५,००/- लक्ष टेंडर रक्कम १२,९४ लक्ष कार्यारंभ आदेश दि.१२.०६.२०२१ लोक वस्ती बाहेरील मुस्लिम दफनभूमीस/ स्मशानभूमीस सदर अनुदान मंजूर दफनभूमीस स्मशानभूमीस कोणत्या नियमानुसार व कशाप्रकारे वापरण्यात आलेला आहे... |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, मला कोणतीच माहिती मिळाली नाही, ती उपलब्ध करुन देण्यात यावी.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.२५.०९.२०२४ रोजीच्या पत्रान्वये नमुना नं.८ ची माहिती दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

उपलब्ध कागदपत्रे व युक्तिवादावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना दिली असल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येत नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि.२४.०८.२०२३ रोजीच्या सुनावणीचे इतिवृत्तात नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी , ग्रामपंचायत बेळंब यांनी सदर स्मशनभुमीबाबत ग्रामपंचायतमध्ये उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन दयावी, असे नमूद केल्याचे दिसून येत आहे. त्याप्रमाणे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी घेतलेला निर्णयामध्ये आयोगास बदल करण्याची आवश्यकता दिसून येत नाही. अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, बेळंबा, ता. उमरगा, जि. धाराशिव यांनी अपिलार्थी यांच्या (दोन) जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, उमरगा, जि. धाराशिव यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह दोन द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.व्दि.अ. ६३२५/२०२३ व ३३२८/२०२३ /एसएस/ १९०५८ दिनांक: १८/10/2024

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २९१२/२०२३**
**बोर्ड अ.क्र.६२**

श्री. सुनिल विष्णू बलसुरे,
मु. पो. कलदेव निबाळा,
ता. उमरगा, जि. धाराशिव

अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय, कलदेव निबाळा,
ता. उमरगा, जि. धाराशिव

: उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, उरमागा, जि. धाराशिव

: उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २५.०९.२०२४)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि.०२.०५.२०२३ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वाद सुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यांनुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, श्री. पांचाळ एस. एस. व प्रथम अपिलीय अधिकारी, श्री. के.बी. भांगे उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशिल |
|---|---|---|
| ६२ | ०३.०२.२०२३ | सन २०१८ ते २०२२ या कालावधीतील विदुतीकरण LED बल्ब बसवणे व कामाची बिले, मोजमाप पुस्तीका व मुदत करार व अंदाजपत्रक. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या

माहिती अर्जाच्या अनुषंगाने अपिलार्थीस ४१ पृष्ठांची माहिती दिलेली असून, अपिलार्थी यांनी दि.२०.०६.२०२४ रोजी माहिती स्वीकारुन माहिती मिळाल्याची पोहच दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्याने, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिलेली आहे. अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत नाही. अपिलार्थीस माहिती दिलेली असल्यामुळे अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.व्दि.अ.२९१२/२०२३/एस/- 19046 दिनांक :- 18/10/2024

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १७४२/२०२३**
**बोर्ड अ.क्र.६३**

श्री. दादासाहेब पंडीतराव बिराजदार, — अपिलार्थी
मु. पो. मुरुम, ता. उमरगा, जि. धाराशिव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — उत्तरवादी क्र.१
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय, अंबरनगर
ता. उमरगा, जि. धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, उरमागा, जि. धाराशिव

(सुनावणी दिनांक २५.०९.२०२४)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि.१०.०३.२०२३ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वाद सुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, श्री. राठोड अनिल चंद्रकांत व प्रथम अपिलीय अधिकारी, श्री. के.बी. भांगे उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशिल |
|---|---|---|
| ६३ | ०९.१२.२०२२ | अंबरनगर येथील वसंतरव नाईक योजने अतंर्गत तांडा वस्ती सुधार योजने अंतर्गत झालेल्या कामाची यादी मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने अपिलार्थीस दि.२०.०६.२०२४ रोजीच्या पत्रान्वये माहिती दिलेली आहे. अपिलार्थी यांनी माहिती

स्वीकारुन पोहच दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिलेली आहे. अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत नाही. अपिलार्थीस माहिती दिलेली असल्यामुळे अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.व्दि.अ.१७४२/२०२३/एस/ 19047 दिनांक: 18/10/2024

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ३००१ ते ३००७/२०२३, ३०१५,३०१६ व ३०२८५/२०२३ एकूण १० नस्ती**

**बोर्ड क्र.६५ ते७४**

श्री. किरण बिबिशन खोसे, — अपिलार्थी
मु. पो. लोहटा (पश्चिम), ता. कळंब, जि. धाराशिव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय, लोहटा (प.), ता. कळंब, जि. धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, कळंब, जि. धाराशिव

**(सुनावणी दिनांक २५.०९.२०२४)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि.१०.०५.२०२३ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दहा द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वाद सुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी, अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, श्री. सुरेश तुकाराम धावारे, व प्रथम अपिलीय अधिकारी, श्री. एन. यु. शिंदे उपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड अ.क्र. | द्वितीय अपील क्रमांक | माहिती अर्जाचा दिनांक | माहितीचा तपशिल/ विषय |
|---|---|---|---|
| ६५ | ३००१/२०२३ | ०८.०२.२०२३ | रमाई योजनेतील चालू घरकुलाची व प्रधान आवास योजनेतील घरकुलाची चालू असलेल्या कामाची माहिती मिळणेबाबत. |
| ६६ | ३००२/२०२३ | ०८.०२.२०२३ | ग्रामपंचायत कार्यालयातील लोहटा (प.), येथील रमाई योजनेतून नवीन किती लाभार्थ्यांचे प्रस्ताव घेतल्याची महिती मिळावी व पंतप्रधान आवास योजनेतील नवीन घेतलेल्या प्रस्ताव लाभार्थ्यांची यादी मिळावी. |
| ६७ | ३००३/२०२३ | ०३.०२.२०२३ | दि.१७.०१.२०२३ रोजीची अर्ज दि.१३.०१.२०२३ च्या रोजी झालेल्या मासीक सभेची प्रोसीडींग नक्कल मिळणेबाबत. |
| ६८ | ३००४/२०२३ | ०३.०२.२०२३ | दि.३१.०१.२०२३ रोजी झालेल्या ग्रामसभेची प्रोसिडींग नक्कम मिळणेबाबत. |
| ६९ | ३००५/२०२३ | ०३.०२.२०२३ | दि.१३.०१.२०२३ रोजीच्या अर्ज दि.१८.१०.२०१९ च्या प्रमाणे सभेची प्रोसीडींग नक्कल मिळणेबाबत. |
| ७० | ३००६/२०२३ | ०३.०२.२०२३ | दि.२६.०१.२०२३ पासून पुढील होणाऱ्या ग्रामसभेच्या आधी नोटीस ग्रामपंचायत कार्यालयात लाऊन व दवंडी देऊन पुढील ग्रामसभा घेण्यात यावी. |
| ७१ | ३००७/२०२३ | ०३.०२.२०२३ | दि.२१.०१.२०२३ रोजी ग्रामपंचायत कायार्सलय लोहटी (प.), येथील ग्रामपंचायत कार्यालयाच्या सर्व खुल्या जोगेचे ८ अ नक्कल मिळणेबाबत. |
| ७२ | ३०१५/२०२३ | ०३.०२.२०२३ | दि.२१.०१.२०२३ रोजी दिलेल्सर अर्ज नवीन ग्रामपंचायत जागेच्या ८ अ ची नक्कल मिळणेबाबत. |

| | | | |
|---|---|---|---|
| ७३ | ३०१६/२०२३ | ०३.०२.२०२३ | नवीन ग्रामपंचायत कार्यालय इमारतीचे निश्चीत केलेले ठिकाण बलदणेबाबत दिलेल्या अर्जाची माहिती मिळणेबाबत. |
| ७४ | ३०२८/२०२३ | ०८.०२.२०२३ | MRGS मधील विहीरीची व गोटे किती मंजूर आहेत व कितीचे कामे चालू आहे ही माहिती मिळावी. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिलेली आहे. तथापि प्राप्त झालेली माहिती चुकीची आहे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे पाठविलेली आहे. माहिती संकलीत करुन आज रोजी सोबत आणलेली असून आयोगाच्या आदेशाप्रमाणे ती अपिलार्थीस देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

उपलब्ध कागदत्रे व युक्तिवादावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना दिली असल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस दिलेली असून माहितीचा एक संच त्यांनी सोबत आणलेला आहे. तथापि अपिलार्थी यांना मिळालेल्या माहितीबाबत शंका आहे. अपिलार्थी यांनी सक्षम प्राधिकरणाकडे दाद मागणे उचित होईल. अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

दहा द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(मुकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.व्दि.अ. ३०८६,३०९१,३१०६,३११६ ते ३११९,६८८३ व ६१३१/२०२३./एसएस/ 19048 दिनांक : 18/10/2024

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ३२९०/२०२३**
**बोर्ड अ.क्र.७५**

श्री. रतन गुलाब मोळवणे, — अपिलार्थी
मु. पो. वाशी, ता. वाशी, जि. धाराशिव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय, रत्नापूर,
ता. कळंब, जि. धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
विस्तार अधिकारी (कृषी),
पंचायत समिती, कळंब, जि. धाराशिव

(सुनावणी दिनांक २५.०९.२०२४)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि.१५.०५.२०२३ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वाद सुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. शिंदे एन. यु. उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशिल |
|---|---|---|
| ७५ | २१.०२.२०२३ | सन१९७० ते २०२३ या कालावधीतील १५८ ग्रा. पं. मिळकत क्रमांकाचे क्षेत्रात बदल झालेबाबत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने अपिलार्थीस दि.२०.०३.२०२३ रोजीच्या पत्रान्वये माहिती दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, चूकीची माहिती

दिली, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिलेली आहे. अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत नाही. अपिलार्थीस माहिती दिलेली असल्यामुळे अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.व्दि.अ.३२९०/२०२३/एस/ 19049 दिनांक: 18/10/2024

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा/ अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ५९३३/२०२३
बोर्ड क्र. ७६

श्री. शहाजी श्रीपती देटे,
रा. सर्व्हे नंबर ५१, प्लॉट नंबर २४०,
भैरवनगर धानोरा रोड, पुणे

अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, इटकुर, ता. कळंब, जि. धाराशिव

: उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, कळंब, जि. धाराशिव

: उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २५.०९.२०२४)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. (तथापि प्रथम अपिलीय अधिकारी स्वाक्षरी केलेला रोजनामा सादर केलेला नाही.)

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक ०१.०४.२०२३ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| सन १९९० ते आजतागायत या कालावधीतील ग्रामपंचायत मध्ये घराची नोंदणी करताना जागेच्या मालकीचा पुरावा काय सादर केला आहे त्याची सत्यप्रती मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली नाही. ती जन माहिती अधिकारी यांच्याकडून उपलब्ध करुन देण्यात यावी अशी विनंती केलेली आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या पत्रावर काहीही कार्यवाही केलेली नाही, त्यामुळे अपिलार्थीस माहिती देता आलेली नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध कागदपत्रे व युक्तिवादावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती दिलेली नाही. अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, इटकुर, ता. कळंब, जि. धाराशिव यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७(६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, कळंब, जि. धाराशिव यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशांसह अपील निकाली काढण्यात येत आहे.

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.व्दि.अ.क्र.५९३३/२०२३/एस एस/ 19050 दिनांक: 18/10/2024

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १४८१/२०२३ व १४८२/२०२३**
**बोर्ड क्र.७७ व ७८**

श्री. अहमद इब्राहिम शेख, — अपिलार्थी
मु. पो. चुंबळी, ता. भूम, जि. धाराशिव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय, चुंबळी, ता. भूम, जि. धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, भूम, जि. धाराशिव

**(सुनावणी दिनांक २५.०९.२०२४)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपिले दाखल केले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड अ.क्र. | द्वितीय अपील क्रमांक | माहिती अर्जाचा दिनांक | माहितीचा तपशिल/ विषय |
|---|---|---|---|
| ७७ | १४८१/२०२३ | ०८.१०.२०२२ | सन २०२० ते जून २०२२ या कालावधीतील, माहेन भाऊसपकाळ, वैजिनाथ संदिपान मोरे व भरत चत्रभुज लेकूरवाळे यांनी ग्रा प चुंबळी गावात गट नं २३७/२२७ मध्ये नवीन इमारत बांधकाम कले आहे. त्या बांधकाम परवाना दिल्यासंदर्भातची संचिकेची झेरॉक्स प्रत मिळावी व इतर |
| ७८ | १४८२/२०२३ | ०८.०९.२०२२ | दि.२३.०६.२०२२ पासून आजपर्यंत या कालावधीतील, दि.२३.०६.२०२२ रोजी लेखी अर्ज दिला होता सदर अर्जासंदर्भाने सदर प्रकरणात ग्रा. प.नी. हस्तक्षेप करुन कार्यवाही करने व गुन्हा नोंद करणे उचित होणार नाही असे नमूद करुन माझा अर्ज निकाली काढला आहे. या अनुषंगाने आपण मला सदर प्रकरणासंदर्भात शासनाचे नियम, अटि, परिपत्रक किंवा शासनाचे निर्णय काही असल्यास कृपया त्याच्या छायांकित प्रति देवून सहकार्य करावे. किंवा न्यायालयात प्रकरण चालू असताना हस्तक्षेप करता येणार नाही अशा संदर्भाने शासनाचे निर्णय असतील तर त्याच्या प्रति मिळाव्यात. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती देण्याचे आदेशीत करुनही जन माहिती अधिकारी यांनी मला कोणतीच माहिती दिलेली नाही. ती उपलब्ध करुन देण्याचे आदेशीत करावे अशी विनंती केलेली आहे.

सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही.

त्या अनुषंगाने त्यांच्याकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, जन माहिती अधिकारी यांच्या माहिती अर्जासंदर्भात केलेल्या कार्यवाहीबाबतची कोणतीही अनुषंगिक कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली नाहीत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, १० दिवसात माहिती देण्याचे आदेश असतानाही अद्याप परिपुर्ण माहिती दिलेली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसून येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अलिपावर सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी यांच्या अदेशाचे पालन झाल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, चुंबळी, ता. भूम, जि. धाराशिव यांनी अपिलार्थी यांच्या दोन जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती (नकाशा वगळून), आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना नोंदणीकृत टपालाद्वारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत कार्यालय, चुंबळी, ता. भूम, जि. धाराशिव यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात मुदतील प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती भूम, जि. धाराशिव यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

४. उपरोक्त निर्देशासह दोन द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.व्दि.अ.१४८१ व १४८२/२०२३/एम.एस/ 19051 दिनांक : 18/10/2024

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा/ अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक २४२८/२०२३
बोर्ड क्र. ७९

श्री. रविंद्र बाबुराव वाघमारे, अपिलार्थी
मु. पो. आष्टा, ता. भूम, जि. धाराशिव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय, आष्टा, ता. भूम, जि. धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, भूम, जि. धाराशिव

(सुनावणी दिनांक २५.०९.२०२४)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक ०३.०२.२०२३ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| दि.०१ जानेवारी २०१५ ते २६ जानेवारी २०२३ या कालावधीतील ग्रा.पं. व पं. स्थरावील १४ वा व १५ वित्त आयोग, तांडावस्ती व अ.जा. नवबोध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे बाबतच्या झालेलया कामाच्या जमा खर्चाची एम बी किर्द (क्रमांक) आराखडे सी सी कामाचे फोटो इ. ची सत्यप्रत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन सात दिवसात माहिती देण्याचे आदेशीत केलेले आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी मला अद्यापपर्यंत माहिती दिलेली नाही. ती जन माहिती अधिकारी यांच्याकडून उपलब्ध करुन देण्यात यावी अशी विनंती केलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न मिळाल्याने असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध कागदपत्रे व युक्तिवादावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना मिळालेली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेशीत करुन अपिलार्थीस माहिती

दिलेली नाही. याबाबीची आयोगाने गंभीर दखल घेतली आहे. अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजन्नत तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, आष्टा, ता. भूम, जि. धाराशिव यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना नोंदणीकृत टपालाद्वारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, भूम, जि. धाराशिव यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.व्दि.अ.क्र.२४२८/२०२३/एस एस/ 19052 दिनांक : 18/10/2024

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा/ अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक २०९२/२०२३
बोर्ड क्र. ८४

श्री. दत्तात्रय सुभाष गोळे, — अपिलार्थी
रा. भोत्रा, ता. परंडा, जि. धाराशिव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय, भोत्रा, ता. परंडा, जि. धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — उत्तरवादी क्र.२
विस्तार अधिकारी (ग्रां.पं.),
पंचायत समिती, परंडा, जि. धाराशिव

(सुनावणी दिनांक २५.०९.२०२४)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी प्रथम अपिलीय अधिकारी, श्री. विकास अजिनाथ सुर्यवंशी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक ०६.१२.२०२२ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| १.मौजे भोत्रा गावामध्ये शौच्यालय निधी किती कुटूंबास वाटप केला आहे. त्या कुटूंबाची गावा सहित माहिती दयावी २.मौजे भोत्रा ग्रामपंचायत कार्यालयासाठी केंद्र व राज्य सरकार यांच्या कडून दि.०१.०१.२०२० ते आज तारखेपर्यंत किती निधी मिळालेला आहे मिळालेला निधी कोणत्या कामासाठी वापरलेला आहे. त्या कामाच्या बिल पावत्याची छायांकित प्रत मिळावी. |

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि.३१.०१.२०२३ रोजी सुनावणी घेऊन, ०७ दिवसात अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशीत केलेले आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही केल्याचे अवगत केलेले नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, दिशाभूल करणारी अर्धवट माहिती दिली, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध कागदपत्रे व युक्तिवादावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, भोत्रा, ता. परंडा, जि. धाराशिव यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. विस्तार अधिकारी (सा.पं.), पंचायत समिती, परंडा, जि. धाराशिव यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशांसह अपील निकाली काढण्यात येत आहे.

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.वि.अ.क्र.२०९२/२०२३/एस एस/ 19053 दिनांक : 18/10/2024

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक -२२१९ व २२२०/२०२३ (०२)
बोर्ड अ.क्र.८५ व ८६

श्री. भालचंद्र नरहरी नेटके, — अपिलार्थी
रा. भोंजा, पो. सोनारी, ता. परंडा, जि. धाराशिव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय, भोंजा, पो. सोनारी, ता. परंडा, जि. धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, परंडा, जि. धाराशिव

( सुनावणी दिनांक २५.०९.२०२४)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि.०३.०४.२०२३ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वाद सुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, श्री. काशीद एम. एम. व प्रथम अपिलीय अधिकारी, श्री. सूर्यवंशी विकास अजिनाथ उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी त्यांच्या दोन माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशिल |
|---|---|---|
| ८५ | ०९.१२.२०२२ | दि.०१ जानेवारी २०१० ते ०९ डिसेंबर २०२२ या कालावधीतील १. किर्द खाते क्र.१ नंबरची नक्कल, २. पाणी पुरवठा किर्द १३ व १४ वित्त आयोग, ४. विविध शासकीय योजना नकला व ग्रामसभा व मासिक मिटींगचे ठरावाच्या नकला. |
| ८६ | १५.०३.२०२२ | दि.०१ जानेवारी २०१० ते ०१ डिसेंबर २०२२ या कालावधीतील सर्व सदस्यांना मासिक सभेच्या आजेंठयाच्या सर्व पोच पावत्याच्या नक्कला. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे देता आलेली नाही.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर कार्यवाही करण्यात आलेली आहे. जन माहिती अधिकारी यांना माहिती देण्याचे आदेशीत केलेले आहे. अपिलार्थी यांना माहिती मिळाली नसल्यास ती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी उपलब्ध करुन देतील ही बाब प्रथम अपिलीय अधिकारी या नात्याने व्यक्तिश: पाहण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न मिळाल्याने, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, भोंजा, पो. सोनारी, ता. परंडा, जि. धाराशिव यांनी अपिलार्थी यांच्या वर नमूद दोन जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, एक वर्षे कालावधीची कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. सदर अवलोकनाच्यावेळी नेमक्या कोणत्या एकवर्षे कालावधीची माहिती हवी आहे. याबाबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांना अवगत करावे. त्यानुसार अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क देण्यात यावी.

२. विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, परंडा, जि. धाराशिव यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह दोन व्दितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.व्दि.अ.२२१९ व २२२०/२०२३/एसएस/ 19054 दिनांक : 18/10/2024

(बोर्ड अ.क्र.८५ व ८६ व्दि अ क्र.२२१९ व २२२०/२०२३ २/२)

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक -२२२४/२०२३**
**बोर्ड अ.क्र.८७**

श्री. बाळासाहेब दिगंबर होरे, — अपिलार्थी
ह.मु. मु. पो. श्रीपूर, ता. माळशिरस, जि. सोलापूर-४१३ ११२.

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय, पिंपळवाडी, ता. परंडा, जि. धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
विस्तार अधिकारी (कृषी / पंचायत),
पंचायत समिती, परंडा, जि. धाराशिव

(सुनावणी दिनांक २५.०९.२०२४)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि.०३.०४.२०२३ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वाद सुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी, अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, श्री भुजबळ आर. एस. व प्रथम अपिलीय अधिकारी, श्री. गायकवाड डी.बी. उपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशिल |
|---|---|---|
| ८७ | १९.११.२०२२ | मु. पो. पिंपळवाडी ता. परंडा, जि. धाराशिव येथील केशव भाऊराव मोरे यांच्या नावांवर मालमत्ता क्र.१० व दिगंबर केशव हिरे यांच्या नावांवर मालमत्ता क्र.१२ होती तरी त्या दोन्ही मालमत्ता त्यांच्या नावावरुन कोणत्या साली मालमत्ता क्र.१० व मालमत्ता क्र.१२ हस्तांतरीत झ ाल्या आहेत त्या दिवसाची तारीख महिना व वर्ष याचा लेखी स्वरुपात तपशील मिळावा. त्यांच्या नावावर कोणत्या दिवसांपर्यंत किंवा वर्षापर्यंत होती. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, मला कोणतीच माहिती दिलेली नाही. ती जन माहिती अधिकारी यांच्याकडून उपलब्ध करुन देण्यात यावी अशी विनंती केलेली आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती ही पुनवर्सन गाव आहे. तहसिलच्या आदेशानुसार जागा दिलेल्या आहेत. कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस दिलेली आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर कार्यवाही करण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, उपलब्ध कागदपत्रे व युक्तिवादावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी व प्रथम

अपिलीय अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद बाजूला सारण्यात येत आहे. अपिलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करतांना प्रयोजनामध्ये, चुकीची माहिती पाठविली,असे कारण नमुद केलेले आहे. अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलाच्या प्रयोजनामध्ये तथ्यांश दिसून येत आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती सत्वर प्राप्त व्हावी, या दृष्टीकोनातून अधिनियमातील कलम १९ (८) (क) (दोन) नुसार विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, परंडा, ता. परंडा, जि. धाराशिव यांना आयोगातर्फे जन माहिती अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. आयोगातर्फे निश्चित जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी (कृषी / पंचायत), पंचायत समिती, परंडा, ता. परंडा, जि. धाराशिव यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, परंडा, जि. धाराशिव यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.व्दि.अ.२२२४/२०२३/एसएस/19055 दिनांक : 18/10/2024

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २२३०,२२३४,२२३५ व २२३६/२०२३**
**बोर्ड क्र.८८ ते ९१**

श्री. अजिनाथ अंगद राऊत, अपिलार्थी
रा. जवळा नि. ता. परंडा, जि. धाराशिव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय, जवळा नि., ता. परंडा, जि. धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
विस्तार अधिकारी (कृषि / पंचायत),
पंचायत समिती, परंडा, जि. धाराशिव

**(सुनावणी दिनांक २५.०९.२०२४)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि.०३.०४.२०२३ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये चार द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वाद सुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, श्री. गुळमिरे व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी श्री. बोडके एस.ए. उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. (तथापि जन माहिती अधिकारी यांनी रोजनाम्यावर स्वाक्षरी केलेली नाही)

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी त्यांच्या चार माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड अ.क्र. | द्वितीय अपील क्रमांक | माहिती अर्जाचा दिनांक | माहितीचा तपशिल/ विषय |
|---|---|---|---|
| ८८ | २२३०/२०२३ | ०७.११.२०२२ | दि.०१ जानेवारी २०१८ ते आजतागायत या कालावधीतील दलीत वस्ती सुधार योजनेतील कामाबाबत. |
| ८९ | २२३४/२०२३ | ०७.११.२०२२ | दि.०१ जानेवारी २०१८ ते आजतागायत या कालावधीतील १३ वा १४ वा १५ वा वित्त आयोग यातून करण्यात आलेली एकूण सर्व कामे, मोजमाप पुस्तीका, काम पुर्णत्वाचे दाखले, प्रशासकीय मान्यता, तात्रीक मान्यता, कार्यारंभ आदेश इत्यादी माहिती साक्षांकित करुन द्यावी. |
| ९० | २२३५/२०२३ | ०७.११.२०२२ | दि.०१ जानेवारी २०१८ ते आजतागायत या कालावधीतील ग्रामपंचायत कायालय कर वसूलीबाबत. |
| ९१ | २२३६/२०२३ | ०७.११.२०२२ | दि.०१ जानेवारी २०१८ ते आजतागायत या कालावधीतील विविध शौचालय योजनांच्या कामाची माहिती मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपिलावर सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेशीत केलेले आहे. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सुनावणी नंतर माहिती दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्याचे आदेश होवून सुध्दा माहिती न दिल्याबाबत, असे कारण नमूद केलेले आहे.

उपलब्ध कागदपत्रे व युक्तिवादावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना दिली असल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येत नाही. ही बाब विचारात घेता, अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, जवळा नि., ता. परंडा, जि. धाराशिवयांनी अपिलार्थी यांच्या वर नमूद चार जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. विस्तार अधिकारी (कृषी / पंचायत), पंचायत समिती, परंडा, जि. धाराशिव यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह चार द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.व्दि.अ. २२३०,२२३४,२२३५ व २२३६/२०२३/एसएस/ 19056 दिनांक: 18/10/2024

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा/ अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक २८६५/२०२३
बोर्ड क्र.९२

श्री. शंकर विठ्ठल घोगरे, — अपिलार्थी
रा. कंडारी, ता. परंडा, जि. धाराशिव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय, कांडलगांव, ता. परंडा, जि. धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
विस्तार अधिकारी (कृषी / पंचायत),
पंचायत समिती, परंडा, जि. धाराशिव

(सुनावणी दिनांक २५.०९.२०२४)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, श्री. भैरवाड जी.एल. व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी श्री. बोडके एस. ए. उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक ०९.१२.२०२२ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| दि.०१.१२.२०२१ ते दि.०९.१२.२०२२ या कालावधीतील ग्रामपंचायतने केंद्र व राज्य सरकारच्या आलेल्या निधीतून कोणकोणी कामे केली. त्या सर्व कामाच्या खर्च निधी पावत्या कामाचे नावे, त्या सर्व कामाचे अंदाजपत्रकच्या झेरॉक्स व साक्षांकीत प्रती देण्यात याव्यात, सदर कालावधीत ग्रामपंचायतचे ऑडीट झाल्याचे कागदपत्र झेरॉक्स देण्यात यावे. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी काहीच कार्यवाही केलेली नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध कागदपत्रे व युक्तिवादावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद

केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, कांडलगांव, ता. परंडा, जि. धाराशिव यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. विस्तार अधिकारी (कृषि / पंचायत), पंचायत समिती, परंडा, जि. धाराशिव यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.वि.अ.क्र.२८६५/२०२३/एस एस/ 1905 दिनांक : 18/10/2024

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४५७०/२०२३ व ५९०७/२०२३**
**बोर्ड क्र ९३ व ९४**

श्री. फारुख बाशामियाँ मुछाणी, — अपिलार्थी
मु. आलेश्वर, पो. डोंजा, ता. परंडा, जि. धाराशिव-

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय, आलेश्वर, ता. परंडा, जि. धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
विस्तार अधिकारी (सां./ पं),
पंचायत समिती, परंडा, जि. धाराशिव

(सुनावणी दिनांक २५.०९.२०२४)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि.१२.०७.२०२३ व ११.०९.२०२३ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वाद सुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, श्री. रायकर व प्रथम अपिलीय अधिकारी, श्री. विकास अजिनाथ सूर्यवंशी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुस्थित आहेत. (तथापि जन माहिती अधिकारी रोजनाम्यावर स्वाक्षरी केलेली नाही.)

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी त्यांच्या दोन माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड अ.क्र. | द्वितीय अपील क्रमांक | माहिती अर्जाचा दिनांक | माहितीचा तपशिल/ विषय |
|---|---|---|---|
| ९३ | ४५७०/२०२३ | ०३.०३.२०२३ | दि.०१.१२.२०२१ ते आजपर्यंत या कालावधीतील ग्रामपंचायत आलेश्वर येथे वाटर फिल्टरच्या प्राण्याचा हिशोब, दररोज किती लिटर पाणी कॉईन झार दिले जाते, कॉईन द्वारे पाणी दिलेल्या हिशोबाचे रजिष्टर व ते रक्कम ग्रामपंचायत खात्यावर भरणा केलेला कॉटर स्लिप |
| ९४ | ५९.०७/२०२३ | ३१.०५.२०२३ | दि.०१.१०.२०२ ते दि.३१.०५.२०२३ या कालावधीतील मौजे आलेश्वर येथून परंडा पंचायत समिती, येते तक्रारी अर्ज किती आले व किती अर्ज निकाली काढण्यात आले, निकाली काढले अर्जा सहीत माहिती मिळणे.. |

आज रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन, अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशीत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, वरिष्ठांचे आदेशाचे

पालन न केल्याबाबत, असे कारण नमूद केलेले आहे.

उपलब्ध कागदपत्रे व युक्तिवादावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना दिली असल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येत नाही. अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, आलेश्वर, ता. परंडा, जि. धाराशिव यांनी अपिलार्थी यांच्या (दोन) जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. विस्तार अधिकारी (सां / पं.), पंचायत समिती, परंडा, जि. धाराशिव यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह दोन द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.व्दि.अ. ४५७०/२०२३ व ५९०७/२०२३ /एसएस/ 1058 दिनांक : 8/10/2024

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक -७९८९/२०२३,७९९०/२०२३ व ७९९१/२०२३ (०३)**
**बोर्ड अ.क्र.९५ ते ९७**

श्री. समाधान अंकुश जगदाळे, — अपिलार्थी
रा. वाणेवाडी, पो. वाकडी, ता. परंडा, जि. धाराशिव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय, लोणी (वाणेवाडी), ता. परंडा, जि. धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
विस्तार अधिकारी (कृषी / पंचायत),
पंचायत समिती, परंडा, जि. धाराशिव

**(सुनावणी दिनांक २५.०९.२०२४)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि.१३.१२.२०२३ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये तीन द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वाद सुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी प्रथम अपिलीय अधिकारी, श्री. गायकवाड डी.बी. उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी त्यांच्या तीन माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशिल |
|---|---|---|
| ९५ | २१.०८.२०२३ | पंचायत समिती फंडातून बोरवलेल पाडलेला असून सर्व झेरॉक्स फाईल मिळणेबाबत. |
| ९६ | २१.०८.२०२३ | सन २००८ ते २०२० या कालावधीतील विंधन विहीर व विहीर अधिग्रहण फाईल मिळणेबाबत. |
| ९७ | २२.११.२०२२ | सन २००८ ते २०२० या कालावधीतील मौजे वाणेवाडी ता. परंडा, जि. धाराशिव येथे कोणत्या विहरी व कोणत्या विंधन विहरी अधिग्रहण विहर केली असता ग्रामसभेचा किंवा मासिक सभेचा ठराव घेतला गेला का.? ठरावाच्या नक्कला देण्यात याव्यात, अधिग्रहण केलेले विहिर व विंधन विहीर याचे कागदपत्रे फाईल देण्यात यावे. |

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर कार्यवाही करण्यात आलेली आहे. जन माहिती अधिकारी यांना माहिती देण्याचे आदेशीत केलेले आहे. अपिलार्थी यांना माहिती मिळाली नसल्यास ती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी उपलब्ध करुन देतील ही बाब प्रथम अपिलीय अधिकारी या नात्याने व्यक्तिश: पाहण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, लोणी (वाणेवाडी), ता. परंडा, जि. धाराशिव यांनी अपिलार्थी यांच्या वर नमूद तीन जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, एक वर्ष कालावधीची कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. सदर अवलोकनाच्यावेळी नेमक्या कोणत्या एकवर्षे कालावधीची माहिती हवी आहे. याबाबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांना अवगत करावे. त्यानुसार अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क देण्यात यावी.

२. विस्तार अधिकारी (कृषि / पंचायत), पंचायत समिती, परंडा, जि. धाराशिव यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह तीन व्दितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.व्दि.अ.७९८९,७९९१ व ७९९०/२०२३/एसएस/ 19059 दिनांक : 18/10/2024

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा/ अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ६९७०/२०२३
बोर्ड क्र.९८

श्री. परमेश्वर विनायक कांबळे, — अपिलार्थी
रा. जेवळी उत्तर, ता. लोहारा, जि. धाराशिव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय, जेवळी उत्तर
ता. लोहारा, जि. धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, लोहारा, जि. धाराशिव

(सुनावणी दिनांक २५.०९.२०२४)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक ११.०७.२०२२ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| संत रोहीदास नगर वार्ड क्र.१ मधील विष्णु कांबळे व राजेंद्र कांबळे यांनी क्लस्टर मध्ये केलेल्या वॉल कंपाऊंडच्या बांधकाम व इतर विषयाबाबत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणी घेतली नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही व सुनावणी घेतली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध कागदपत्रे व युक्तिवादावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, जेवळी उत्तर, ता. लोहारा, जि. धाराशिव यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, लोहारा, जि. धाराशिव यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.व्दि.अ.क्र.६९७०/२०२३/एस एस/----19060---- दिनांक :----18/10/2024----